सं.फौ.ख.क्रं. ७३७/२०२१

सरकार –वि– गजानन बावस्कर

नि.क्र. २० खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — अंबादास हरी बाभुळकर,

वय. ५८ वर्षे, व्यवसाय — मजुरी,

राहणार – शेलोडी, ता. खामगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

१. दि. ०३.०५.२०२१ रोजी शेगाव येथील सरस्वती कॉलेजच्या पाठीमागे माझ्यासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा करण्यात आला नव्हता. मला आता घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. १ म्हणुन माझी सही आहे. त्यामधील मजकुर मला माहित नाही. त्याला सहीपुरता **नि.क्र.२१** देण्यात येतो.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता त्यांना परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३.०५.२०२१ रोजी शेगाव येथील सरस्वती कॉलेजच्या पाठीमागे मी पंच म्हणून हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझ्या सोबत दुसरा पंच संतोष गावंडे होता. हे म्हणणे खरे नाही की, नाईक पोलीस शिपाई उमेश बोरसे यांनी पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीकडून रोख रक्कम ३७०/– रुपये, वरली मटक्याचे आकडे लिहिलेली चिठ्ठी व एक डॉट पेन जपत केला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा माझ्या समक्ष तयार करुन तो मला वाचून दाखविण्यात आला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखत असल्यामुळे त्याला शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती तळणीकर यांनी नाकारला.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि. १५.११.२०२५ | दि. १५.११.२०२५ |